PUNE RESEARCH WORLD ISSN 2455-359X
AN INTERNATIONAL JOURNAL OF INTERDISCIPLINARY STUDIES VOL 8, ISSUE 4

# महाराष्ट्रातील उद्योजकता विकास व महिला सक्षमीकरण

**डॉ. जयंतकुमार एम. मस्के**
**अर्थशास्त्र विभाग प्रमुख,**
**एस. एन. मोर महाविद्यालय, तुमसरए** जि. भंडारा
**महाराष्ट्र भारत**

## सारांश (Abstract) :

आज देषाच्या आर्थिक व सामाजिक विकासाकरिता महिलांचे योगदान महत्वाचे आहे. आज महिलांना तिच्या अधिकाराची जाण निर्माण झाली आहे. भविष्यात बदलत्या काळानुसार विकास प्रक्रियेमध्ये महिलांचा वाटा फार मोलाचा ठरणार आहे. महिला सक्षमीकरण हे महिलांच्या उत्थानाकरिता उचललेले सकारात्मक पाऊल आहे. पुरूषांचे वर्चस्व असलेल्या अनेक क्षेत्रांमध्ये महिलासुद्धा उल्लेखनिय कामगीरी करीत आहेत मात्र विषेष म्हणजे उद्योग क्षेत्रात पुरूषांच्या तुलनेत महिलांचा सहभाग कमी आहे. महिलांमध्ये उद्योजकता विकास ही भावना रूजविणे एक मोठी समस्या आहे. परंतू याला कोणत्याही अर्थव्यवस्थेतील बेरोजगारीची समस्या व स्त्रीयांचे सक्षमीकरण करण्यासाठी एक रामबाण उपाय म्हणून मानले आहे. या षोधनिबंधात महाराष्ट्रातील महिला उद्योजकांचा विकास कसा साधता येईल याबद्दल विष्लेषण केले आहे.

**Keywords** : महिला सक्षमीकरण, उद्योजकता विकास, आर्थिक विकास.

**प्रस्तावना :**

आज संपूर्ण विष्वात महिला सक्षमीकरण करण्यासाठी आणि त्यांना आर्थिक स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी स्वयंरोजगार निर्माण करणे आणि त्यांच्या अंगी असणा–या उद्योजकतेचा विकास करणे अपरिहार्य ठरते. अलिकडे महिला सक्षमीकरणावर भर असून एक सक्षम महिला कुटूंब आणि देषाच्या विकासाला सहाय्य करू षकते. एवढी मानसीकता तयार होत आहे. स्वतंत्र भारतामध्ये स्त्री बद्दलच्या समाजाच्या वर्षानुवर्षाच्या दृष्टीकोणात बदल होत असल्याचे अलीकडील स्त्रीच्या वाटचालीवरून दिसून येत आहे.

स्वतंत्र भारतात आर्थिक विकासामध्ये वरील प्रगती होत असतांना यामध्ये महिलांची भागीदारी सुद्धा वाढत आहे. हळूहळू सर्व क्षेत्रात स्त्रिया सक्रीय होत आहेत. वर्षानुवर्षे पुरूषांचे वर्चस्व असलेल्या औद्योगिक उद्योजकता या क्षेत्रात सुद्धा महिला सक्रीय होउन महिला उद्योजकतेच्या क्षेत्राला देषातील महिला अधिक मजबूत बनवित आहेत. एकंदरीत भारतासारख्या विषाल देषात महिलांची उद्योगावरची पकड मजबूत होत आहे. आज सर्व स्तरातील महिला आत्मविष्वासाने कार्य करीत आहेत. त्यांच्या कार्यावरून लक्षात येते की कोणतेही काम करण्यामागे जर हेतू चांगला असेल तर नियती अर्थात भाग्यही नक्कीच साथ देते असं म्हणता येईल. भारतीय उद्योग जगतामध्ये ज्या महिला धडाडीने कार्य करीत आहेत. त्या इतर अनेक महिलांना प्रेरणासुद्धा देत आहेत. जिवनात सन्मान आणि संपदा कधी कोणी देत नाही ते तर स्वतः कमवावं लागतं आणि याकरीताच प्रामाणिक प्रयत्न कषाप्रकारे आवष्यक आहेत हे अनेक यषस्वी महिला उद्योजकांच्या जिवनचरित्रावरून दिसून येते. आज आवष्यकता आहे महिलांनी उद्योग आणि स्वरोजगाराच्या क्षेत्रात पदार्पण करून आपल्या व्यक्तीमत्वाचा विकास करून स्वावलंबी बनावं व आपल्या कुटुंबाला आर्थिक रूपाने अधिक मजबूत करण्याकरीता पूढे येऊन आर्थिक व सामाजीक प्रगतीमध्ये आपली भागीदारी नोंदवावी. जेणेकरून एक सषक्त राष्ट्र निर्माण होऊन आपले जिवन नक्कीच सार्थकी लागेल.

**महिला उद्योजक म्हणजे काय? :**

सामान्यतः महिला उद्योजक म्हणजे अषी स्त्री, जी एखाद्या उद्योगाची स्थापना करते, उद्योगाचे संचालन करते, किंवा त्या उद्योगाला यषस्वी करण्यासाठी काही कार्याची जबाबदारी स्विकारते. त्याचप्रमाणे एखादी महत्वाकांक्षी स्त्री पुढाकार घेऊन उद्योगाची भूमिका स्विकारते आणि ही भूमिका पार पाडण्यासाठी आवष्यक ते प्रयत्न करते अषा स्त्रीला महिला उद्योजक असे म्हणतात.

भारत सरकार च्या मते, ''महिला उद्योजक म्हणजे अषी उद्योजिका जी उपक्रमाचे संचालन व नियंत्रण करीत असून, उद्योगामध्ये तिचे 51 टक्के आर्थिक हित समाविष्ट असते व उद्योगातील एकूण रोजगारापैकी 51 टक्के रोजगार महिलांना प्रदान करते.''

**महिला सक्षमीकरण म्हणजे काय ?**

कायदे व कल्याण कार्यक्रमांच्या माध्यमातून सामाजिक, षैक्षणिक, आर्थिक व राजकीय अषा सर्व क्षेत्रांमध्ये महिलांना हक्क प्रदान करून त्यांना पुरूषांच्या बरोबरीने हक्क व दर्जा प्रदान करणे, विकासासाठी संधी उपलब्ध करून देणे आणि त्याआधारे स्त्री–पुरूष असमानता नष्ट करणे या प्रक्रियेला महिला सक्षमीकरण असे म्हणतात.

महिला सक्षमीकरण म्हणजे महिलांना स्वावलंबी बनविणे असा साधारणतः अर्थ काढता येईल. सामाजिक दृष्टीकोणातून स्त्रियांवर अन्याय सुरू आहे. या अन्यायाची भरपाई करणे म्हणजे स्त्रीयांचे सक्षमीकरण होय. थोडक्यात स्त्रिला सामाजिक, आर्थिक, राजकीय व प्रषासकीय क्षेत्रात योग्य प्रमाणात सहभागी करून निर्णय प्रक्रियेत सहभागी करणे म्हणजे स्त्री सक्षमीकरण होय.

**महाराष्ट्रातील महिला उद्योजकांचा विकास :**

महाराष्ट्र राज्याची पुरोगामी राजकीय सुधारणाची प्रदिर्घ अषी परंपरा आहे. महाराष्ट्र राज्य देषामध्ये आर्थिक, सामाजिक क्षेत्रात सुधारलेले राज्य म्हणून पुढे आले आहे. तरीपण महाराष्ट्रातील स्त्रियांना कौटूंबिक–सामाजिक असुरक्षितता, बेरोजगारी, आरोग्य सेवांचा अभाव, दारिद्रय, कुपोषण या समस्यांना सामोरे जावे लागते.

महाराष्ट्राने स्त्रीयांच्या विकासासाठी अनेक धोरणे आखलेली आहेत व अनेक कार्यक्रम राबविले आहेत. 1975 मध्ये महाराष्ट्र शासनाने दारिद्रय रेषेखालील स्वतःचा व्यवसाय सुरू करणा–या स्त्रीयांसाठी महिला आर्थिक विकास महामंडळ सुरू केले. हे महामंडळ प्रशिक्षण, कर्जप्राप्तीस सहाय्य करते. महिला सहकारी संस्थांना सरकारकडून 100 टक्के आर्थिक मदत दिली जाते. केंद्रशासनाच्या धरतीवर महाराष्ट्राने 1953 रोजी राज्य महिला आयोगाची स्थापना केली. महिलांच्या सक्षमीकरणासाठी स्त्रियांना विविध उद्योगधंद्याच्या ठिकाणी होणारे आजार, कामाच्या ठिकाणी होणारा लैंगिक छळ, शैक्षणिक समस्या या सारख्या समस्यांचा अभ्यास करून महिला विषयक धोरण आखण्यासाठी राज्य षासनास मदत करणे ही कार्ये या आयोगाला करावी लागतात. 1994 मध्ये महिला धोरण तयार करणारे महाराष्ट्र हे भारतातील पहिले राज्य ठरले. धोरणाचा आढावा घेऊन 2001 मध्ये नवे महिला धोरण जाहिर केले. या धोरणाची वेशिष्टये महिला सक्षमीकरणासाठी पुरेशा निधीची उपलब्धता करून देणे, स्वयंसहायता गटाद्वारे आर्थिक विकास साध्य करणे, षासकिय, निमशासकिय व षासन अनुदानित संस्थांमध्ये महिलांना केंद्रिभूत मानुन नियोजन करणे, कृषी व ग्रामीण विकास कार्यक्रमांची आखणी महिलांना केंद्रस्थानी ठेवून करणे हे आहे. महिला सक्षमीकरणासाठी महाराष्ट्र षासनाने अनेक योजना राबविल्या आहेत. त्यामध्ये बहुउद्देशिय महिला केंद्र – षासनाच्या विविध योजनांची माहिती देणे, कायदेविषयक सल्ला, आपादग्रस्त महिलांना आधार देणे अशा सेवा या केंद्रामार्फत दिल्या जातात; कामधेनू योजना – नोंदणीकृत महिला संस्थांना शासकिय संस्थांना लागणा–या वस्तू निर्मितीचे 50 टक्के काम दिले जाते; महिला मंडळाच्या महिला प्रशिक्षण केंद्रास अनुदान देण्यात येते; व्यावसायिक

प्रशिक्षण घेणा–या मुलींना विद्यावेतन देण्यात येते; स्वयंरोजगारासाठी महिलांना व्यक्तीगत अनुदान देण्यात येते इत्यादी. महिला सक्षमीकरणासाठी यासारख्या योजना महाराष्ट्र षासन राबवित असल्यामुळे त्यांच्यामध्ये उद्योजकतेची भावना वाढण्यास मदत होत आहे. महिलांच्या सक्षमीकरणात महाराष्ट्र षासनाअंतर्गत महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र मोलाचे कार्य करीत आहे. तरीपण पुरूषांच्या तुलनेत महिला उद्योजकांचे प्रमाण कमी आहे.

Economic and Social Commission for Asia and the Pacific Report 2013 या अहवालानुसार महिला उद्योजकांचा विचार करता महाराष्ट्राचा देषात 5 वा क्रमांक लागतो. महाराष्ट्रातील महिला उद्योजकांची संख्या 8.98 हजार व पुरूष उद्योजकांची संख्या 77.61 हजार एवढी आहे. पुरूष उद्योजकांच्या तुलनेत महाराष्ट्रामध्ये महिला उद्योजकांचे प्रमाण 6. 97 टक्के आहे. महाराष्ट्र हे औद्योगिक क्षेत्रामध्ये अग्रगण्य राज्यांपैकी एक असून देषाच्या वस्तू निर्माण क्षेत्रामध्ये राज्याचे महत्वाचे स्थान आहे. आर्थिक विकासात हे राज्य नेहमीच आघाडीवर असून राज्याच्या अर्थव्यवस्थेवर औद्योगिक व सेवा क्षेत्रातील वाढीचा मोठा प्रभाव राहीला आहे. महाराष्ट्राचे आर्थिक सर्वे 2015–16 मध्ये दिल्यानुसार महाराष्ट्रातील सुक्ष्म, लघू व मध्यम उद्योगांची एकूण संख्या 2007–08 मध्ये 10,244 होती. ती 2011–12 मध्य 15,606 व 2015–16 मध्ये 20,220 पर्यंत वाढली आहे. 2007–08 मध्ये सुक्ष्म, लघू व मध्यम उद्योगामध्ये 2,881 कोटी रूपये गुंतवणूक करण्यात आली व त्यापासून 1.39 लक्ष व्यक्तींना रोजगार प्राप्त झाला. 2011–12 मध्ये या उद्योगामध्ये 4,443 कोटी रूपये गुंतवणूक करण्यात आली व त्यापासून 2.07 लक्ष व्यक्तींना रोजगार प्राप्त झाला. आता तसेच 2015–16 मध्ये या उद्योगांमध्ये 4,090 कोटी रूपये गुंतवणूक करण्यात आली व त्यापासून 1.66 लक्ष व्यक्तींना रोजगार प्राप्त झाला. एकूणच महाराष्ट्रामध्ये औद्योगिक युनिटची संख्या वाढली. मात्र त्याप्रमाणात रोजगार प्राप्त होवू षकले नाही. त्यातही महिला रोजगार प्राप्त व्यक्तींचे प्रमाण पुरूषांच्या तुलनेत कमी आहे. मात्र महाराष्ट्र षासनाच्या औद्योगिक धोरणामुळे महिला उद्योजकतेकडे वळत आहेत. आज महाराष्ट्राच्या काणाकोप–यात अगदी छोटया गावातही महिला काहीना काही करतांना दिसतात. काहींच्या उद्योगांचा विस्तार स्थानिक

बाजारपेठेपुरताच मर्यादित न राहता काही महिला उद्योजकांनी राष्ट्रीय बाजारपेठ व विदेषी बाजारपेठाही काबीज केल्या आहेत. तरीपण त्याचे प्रमाण अल्प आहे. त्यात वाढ झाल्यास ख–या अर्थाने महिला सक्षमीकरणात वाढ झाली असे म्हणता येईल.

**महाराष्ट्रातोल महिला सक्षमीकरण :**

महाराष्ट्रातील महिलांच्या सक्षमीकरणासाठी महाराष्ट्र षासनाने महिलांना त्यांच्या अग्रक्रमानुसार आयुष्य जगता यावे यासाठी सर्व क्षेत्रामध्ये समान संधी व त्यांना आपले उद्दिष्ट साध्य करता येण्यासाठी आवष्यक ती साधनसामुग्री उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला आहे. त्यासाठी 1994 मध्ये स्वतंत्र महिला धोरण आखुण महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीने एक महत्वाचे पाऊल टाकले. परंतु महिला सक्षमीकरणासाठी उपक्रमाबरोबरच निर्णय प्रक्रियेत त्यांचा सहभाग आवष्यक आहे हे लक्षात घेऊन महाराष्ट्र षासनाने 2001 मध्ये नवे महिला धोरण जाहीर केले. या दोन्ही धोरणाद्वारे महिलांच्या विकासाच्या विविध बाबींवर विषेष लक्ष देण्यात आले. ज्यामुळे महिलांमध्ये षैक्षणिक प्रगती, आरोग्य सुधारणा व कायद्याची जनजागृती इत्यादी ठळक ध्येयावर भर देण्यात आला.

राष्ट्रीय पातळीवर सर्व षिक्षा अभियान जोरात राबविले जाते. मात्र प्रत्यक्षात मुलींच्या षिक्षणाची मोहीम महाराष्ट्रात म्हणावी तषी रूजली नसल्याचे स्पष्ट झाले आहे. राज्यात अजुनही ग्रामीण भागात सुषिक्षित स्त्रियांची संख्या कमीच आहे. अनेक जिल्हयातील हजारो स्त्रियांना साधी अक्षराची ओळखही नसल्याचा निष्कर्ष समोर आला आहे. महिलांच्या षिक्षणाच्या बाबतीत महाराष्ट्र पिछाडीवर असून राज्यातील 40 टक्के महिला त्यापासून वंचित आहेत. देषाप्रमाणेच महाराष्ट्रातील महिलांचा लिंग विकास निर्देषांक बराच खाली आहे. राज्यातील महिलांच्या षैक्षणिक प्रगतीसाठी षिक्षणविषयक अनेक संधी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. यामध्ये महिलांकरीता षिष्यवृत्ती, वस्तीगृहे, षैक्षणिक कर्जाची सोय, व्यवसायिक प्रषिक्षणामध्ये आरक्षण इत्यादी सुविधा देण्यात आल्या आहेत.

स्त्री–पुरूष समानता व स्त्री भेदभाव नष्ट करणे ही मूल्ये राज्याच्या सर्व नियोजनात व योजनात प्रतिबिंबीत होण्यासाठी जेंडर बजेटींगची तरतूद करण्यात आली आहे. महिलांच्या सक्षमीकरणासाठी महिलांचे केवळ षारीरिकच नव्हे तर त्यांचे मानसिक, भावनिक, आध्यात्मिक व सामाजिक आरोग्य जपणे गरजेचे आहे. त्यादृष्टीने राज्यातील महिलांच्या आरोग्यासाठी विषेष महिला आरोग्य अभियान राबविण्यात आली आहेत. महिला आरोग्याची स्थिती समजून घेण्यासाठी महिला आरोग्य निर्देषांक मोजला जाईल याषिवाय असंघटीत व अपंग महिलांसाठी महिला आरोग्य विमा योजना, आरोग्य क्षेत्रात काम करणा–या वैयक्तिक महिला व संस्थांना प्रोत्साहन पुरस्कार, फिरती रूग्णालये, लैंगिक अत्याचाराच्या उपचारासाठी विषेष केंद्रांची उभारणी इत्यादी महत्वपूर्ण धोरणे राबविण्यात आली आहेत. महाराष्ट्र षासनाने महिला सक्षमीकरणासाठी उद्योजकता विकास प्रषिक्षण कार्यक्रमांचे आयोजन करणे, त्यांच्यासाठी वित पुरवठा योजना आखणे, सरकारी धोरणकर्त्यांना तसेच बॅंकांना त्यांच्या सहाय्यासाठी उद्युक्त करणे इत्यादी पावले उचचली आहेत. त्याकरीता महिलांना लघुउद्योग, स्वयंरोजगार तसेच संवाद कौषल्य याचे प्रषिक्षण देण्यात येते. महिला उद्योजक निर्माण करण्यासाठी जिल्हा उद्योग केंद्राच्या धर्तीवर स्वतंत्र यंत्रणा निर्माण करण्यात येतात. महिला उद्योजकांना आवष्यक असणारे सर्व कर्ज, परवाने, मंजुरी, वित्तीय सहाय्यक, करारनामे इत्यादी सुविधा एक खिडकी योजनेच्या माध्यमातून देण्यात येते. सध्या अनेक अधिनियम, कायदे महिलांविषयी संवेदनषिलता दाखविणारे व त्यांचे हक्क प्रस्थापित करणारे आहेत. तरीही त्याची अंमलबजावणी, समाजाचा दृष्टीकोण व अधिनियमातील त्रृटी यामुळे महिला कायद्याचा वापर करू षकत नाही. म्हणून महाराष्ट्र राज्यात मा. न्यायालयाच्या अंतर्गत समन्वय वाढविण्याच्या अनुषंगाने विविध उपाययोजना आखण्यात आल्या आहेत. या अंतर्गत महिला व बाल विकास विभागातर्फे अंमलबजावणी करण्याची षासनाची बांधिलकी आहे.

## निष्कर्ष :

महिला सक्षम व्हाव्यात म्हणून सरकारतर्फे विविध योजनांची घोषणा होते. विविध योजना व कायदे महिलांच्या बाजुने असुनही त्यांचे सक्षमीकरण पुर्णपणे होतांना दिसत नाही.

सक्षमीकरणाच्या बाबतीत फक्त बोटावर मोजण्याइतक्या महिला समोर येत आहेत बाकी सर्व महिला मागेच राहणे पसंत करतात. महिला सक्षमीकरणासाठी महाराष्ट्र षासनातर्फे अनेक योजना व कार्यक्रम राबविले जातात. अत्यंत तळमळीने धोरणे ठरविली जातात. मात्र त्याची अंमलबजावणी त्याच तळमळीने होत नाही. लाभार्थी गटापर्यंत योजनांचे फायदे पोहचत नाही. अजुनही महिला आपल्या हक्कासंबंधी जागरूक नाहीत. आहे त्यात समाधान मानण्याची प्रवृत्ती व कौषल्यपूर्ण व्यवस्थापनाचा अभाव यामुळे मराठी स्त्री उद्योजक प्रवृत्तीयूक्त बनलेली नाही. स्त्री–पुरूष भेदभावाविषयी असलेली समाजाची मानसिकता अजुनही बदलत नाही. म्हणूनच महाराष्ट्रात महिला उद्योजकांच्या विकासामध्ये वाढ झालेली नाही. त्यासाठी विविध स्वयंसेवी संस्था व षासन यांनी एकत्रितपणे मोठया प्रमाणात जाणिव जागृतीचे कार्यक्रम राबविले पाहिजेत. त्याशिवाय स्त्रीयांचा मोठया प्रमाणात विकास षक्य नाही.

## संदर्भ :


1. UNDP – Human Development Reports – 2016.
2. National Mission for Empowerment of Women, Ministry of Women & Child Development, Government of India. (www.nmew.gov.in)
3. Economic Survey of Maharashtra 2015-2016.
4. Eleventh Five Year Plan 2007-2012 Planning Department Government of Maharashtra, Mumbai.
5. उद्योजक – मार्च 2011, महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र, औरंगाबाद.
6. महिला एवंम बालविकास मंत्रालय, भारत सरकार, वार्षिक रिपोर्ट 2016–2017.
7. बियाणी प्रकाश, भारतीय उद्योजिका शून्य ते शिखर, इंद्रा पब्लिशिंग हाऊस, भोपाल, 2010.
8. जाधव तुकाराम – संपादक, 'महाराष्ट्र वार्षिकी' 2008–2009, द युनिक ॲकॅडेमिक, पुणे.
9. दास्ताने संतोष – 'महाराष्ट्र 2007', दास्ताने रामचंद्र आणि कं., पुणे.